

ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 4.197(IIJIF)
(UGC Approved
Journal No. 63716)


# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL. 4 NO. 1 JAN. 2018 BOOK V
A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

**SPECIAL ISSUE**
On the Occasion of One Day National Conference On

## Role of Women In Indian Economic Empowerment

27th January, 2018



*Editor*
**Dr. Minakshi B. Jadhav**

*Principal*
**Dr. A. D. Mohekar**

ORGANIZED BY
DEPARTMENT OF ECONOMICS
DNYAN PRASARAK MANDAL'S
SHIKSHAN MAHARSHI DNYANDEO MOHEKAR MAHAVIDYALAYA,
KALAMB, DIST. OSMANABAD

Scanned with OKEN Scanner

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

# CONTENTS


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | बचतगट आणि महिला सबलीकरण | डॉ.शिवाजी भ.यादव | 07 |
| 2. | बचतगट आणि महिला सबलीकरण | डॉ.प्रमोद बा. बेरळीकर | 10 |
| 3. | भारतीय स्त्री विषयक कायदा - एक अभ्यास | प्रा. अरूणा गं. पोटे | 13 |
| 4. | बचत गट आणि महिला सबलीकरण -एक चिंतन | प्रा. मारुती अ.लोंढे<br>डॉ टी. एल. बारबोले | 15 |
| 5. | Unorganized Sector Of Retailing & Rural Women Empowerment | **Mr. R. V. Shetgaokar** | 17 |
| 6. | जीएसटी आणि भारतीय अर्थव्यवस्था | सहा.प्रा.ए.डी.मडावी | 21 |
| 7. | महिला सबलीकरण प्राचीन काळापासून आजपर्यंत | डॉ. भिसे नितीन हनुमंत<br>डॉ. शेळके मधुकर पिराजी | 25 |
| 8. | कृषी , उद्योग व सेवा क्षेत्राचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | डॉ.वाय.बी.चव्हाण | 28 |
| 9. | महिला सबलीकरणात बचत गटाची भुमिका | डॉ. विश्वनाथ कंधारे | 31 |
| 10. | Role Of Women In Economic Development | Dr.Kamalakar D. Jadhav | 34 |
| 11. | Agriculture Sector In Indian Economy | Dr. Suhas Ganpat Gopane | 36 |
| 12. | भारतीय अर्थव्यवस्था आणि महिला सक्षमीकरण | डॉ. जाधव मिनाश्री भास्कर | 38 |
| 13. | बचत गट आणि महिला सबलिकरण | डॉ. खोंड सुरेश वसंतराव | 42 |
| 14. | महिला सक्षमीकरण आणि अर्थकारण | डॉ. अशोक पु. टिपरसे | 45 |
| 15. | लघु आणि कुटीर उद्योगात महिलांचा सहभाग | **डॉ .दास .डी .के .** | 47 |
| 16. | Women's Entrepreneurial Participation in ... | Dr. Pankaj B. Chaudhari | 50 |
| 17. | महिला सबलिकरण आणि शासकीय योजना | डॉ.नरसिंग भानुदास देशमुख | 58 |
| 18. | महिला सबलीकरणात बचत गटाची भूमिका | डॉ . महेश प्रभाकरराव देशमुख | 61 |
| 19. | ग्रामीण विकासात महिला बचत गटांची भूमीका | प्रा. यादव जे.बी | 64 |
| 20. | महिला सबलीकरणात स्वयंसहायता गटाची भूमिका | प्रा. खंडू म. नवखंडे<br>प्रा. ज्ञानेश्वर ए. खोजे | 67 |
| 21. | महिला व सामाजिक चळवळी | प्रा. सौ. कांबळे एस. पी. | 70 |
| 22. | भारत निर्माण कार्यक्रमाचा महिला सक्षमीकरणावरील प्रभाव | डॉ.वसंत दादारावजी पाटील | 73 |
| 23. | Self Help Group & Women Empowerment | Birajdar S.G. & Dr.Varshetti R. | 77 |
| 24. | जीवनोंन्नती अभियान आणि ग्रामीण महिला सक्षमीकरण-एक आढावा | प्रा. शेळके सी.एस. | 80 |
| 25. | बचत गट आणि महिला सबलीकरण:एक दृष्टिक्षेप | श्री. परशुराम पाटील | 83 |
| 26. | महिलांच्या आर्थिक सबलीकरणात बचतगटाची भूमिका | प्रा.डॉ.मोरे अर्जुन मोहनराव | 85 |
| 27. | भारतातील महिला सबलीकरण आणि महिलांचे अधिकार | डॉ. संजय काळे | 87 |
| 28. | Role Of Self-Help Groups In Women Empowerment ... | Dr. B.M.Ekukekar | 89 |
| 29. | साहित्य क्षेत्रातील महिलांचे सबलीकरण २१ व्या शतकाच्या संदर्भात | प्रा. जाधवर शशिकांत श्री. | 91 |
| 30. | Women Empowerment In India : Fact And Tendency | Dr.G.L.Shendge & G.T.Pawar | 94 |
| 31. | भारतातील महिलांचे सक्षमीकरण | प्रा.डॉ.सतिश गव्हाणे | 96 |
| 32. | भारताच्या आर्थिक विकासात बचत गटांच्या माध्यमातून महिलांची भूमिका | प्रा.अदाटे नागनाथ म. | 99 |
| 33. | बचतगट आणि महिला सबलिकरण | प्रा. अनंत नरवडे | 102 |
| 34. | बचत गट आणि महिला सबलीकरण | निंबाळकर अनिल धु. ,<br>डॉ.भालेराव जे.एम. , डॉ. तिकांडे आर.पी. | 105 |




Scanned with OKEN Scanner

Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

12.

# भारतीय अर्थव्यवस्था आणि महिला सक्षमीकरण

**श्रीमती प्रा. डॉ. जाधव मिनाश्री भास्कर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शि.म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब, ता. कळंब, जि. उस्मानाबाद 413507

**प्रस्तावना :**

भारतीय अर्थव्यवस्था आज परिवर्तनाच्या उंबरठ्यावर उभी असली तरी खऱ्या अर्थाने ती कृषी-अधिष्ठीत आहे. हे कोणालाही नाकारता येत नाही. स्वातंत्र्योत्तर काळात आर्थिक विकासाकरीता आपा पंचवार्षिक योजनांच माध्यमाद्वारे प्रयत्न करीत आलो आहोत. आज भारत देशाला मोठी गरूडझेप, आर्थिक महासत्ता व मोठी प्रगती साधायची असेल तर महिला सक्षमीकरण आवश्यक आहे. महिला सक्षमीकरणासाठी समाज, देश आणि महिलांनी एकत्रित प्रयत्न गरजेचे आहे. हे प्रयत्न समाजातील तळागाळापर्यंत पोहोचले तरच महिलांचे सक्षमीकरण झपाट्याने होईल. भारतासारख्या विकसनशील देशात लोकसंख्येत निम्मा वाटा असणाऱ्या महिलांना विकासाच मुख्य प्रवाहाबरोबर न ठेवणे हे कृत्य अमानवीय आहे.

महिलांची ही निम्मी लोकसंख्या अडाणी, अज्ञाणी आणि अशिक्षीतपणाच्या गर्ततून बाहेर काढून देशातील समस्त महिलांना, सत्ता संपत्ती आणि संधीची समानता देऊन विकासाच्या मुख्य प्रवाहात आणने ही एक काळाची गरज बनली आहे. महिला आर्थिक सक्षमीकरणामध्ये भारत जगापेक्षा खूपच मागे आहे. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणामध्ये एकूण 128 देशांमध्ये भारताच्या क्रमांक 15 वा आहे. दरवर्षी जवळपास साडेपाच कोटी महिलांचा भारताच्या कामासाठी उपलब्ध असलेल्या मनुष्यबळात समावेश होतो. भारतीय पुरूषांच्या तुलनेत महिलांचा एकूण जीडीपी मधील वाटा 27 टक्के आहे.

पारंपारिक भारतीय समाजात महिलांना अनेक हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले होते. पुरूषप्रधान समाजव्यवस्थेमुळे महिलांना मिळणाऱ्या दुय्यम स्थानामुळे स्त्री पुरूष विषमता निर्माण झाली. मध्ययुगीन कालखंडात रूढीवादी समाजामुळे तत्कालीन स्त्रियांचा दर्जा घसरलेला होता. 19 व्या शतकात अनेक समाजसुधारकांनी महिलांची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला. महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्वत: सावित्रीबाई फुले यांना शिकवून पुण्यात 1848 मध्ये मुलींची शाळा काढली. स्त्री पुरूषांना समान अधिकार मिळाले पाहिजेत. तसेच समाज विकासात पर्यायाने देशाच्या सर्वांगीण विकासात स्त्री महत्वाचा घटक असूनसुद्धा पुरूषप्रधान समाजव्यवस्था, धार्मिक कल्पना, सामाजिक रूढी व परंपरा इत्यादीमुळे महिलांना हक्काचे संरक्षण व शिक्षण मिळाले पाहिजे. या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले गेले.

महर्षी कर्वे यांनी 1916 मध्ये श्रीमती नाथीबाई टाकरसी महिला विद्यापीठाची (एस.एन.डी.टी.) स्थापना केली. अनेक महिला शिक्षीत होऊ लागल्या. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सामाजिक परिवर्तन घडून येण्याच्या दृष्टीने, महिलांचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने विकासात्मक अनेक कायदे केले गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांना शिक्षण मिहाले पाहिजे, त्या सामाजिक प्रवाहात पुरूषांच्या बरोबरीने आल्या पाहिजेत. त्यांचे संपूर्ण हक्क त्यांना मिळाले पाहिजेत म्हणून भारतीय संविधानात मोठे अधिकार दिलेले आहेत. संविधानाने जात, धर्म, लिंग, इत्यादी कोणत्याही आधारावर भेदभाव न करता राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात पुरूष आणि महिलांना समान संधी आणि अधिकार दिलेले आहेत.

**महिला सक्षमीकरण म्हणजे काय?**

"स्त्रियांच्या अंगी आत्मविश्वास, आत्मसन्मान, स्वावलंबन, निर्णयक्षमता, दृढ निश्चय करण्याची योग्यता निर्माण करणे. तसेच स्त्रियांचे राजनैतिक, शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक सामर्थ्य वाढवून 'स्व' निर्माण करणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय."

**अभ्यासाची उद्दीष्ट्ये :**

a. भारतीय अर्थव्यवस्थेतील महिलांच्या सामाजिक, आर्थिक समस्या जाणून घेणे.
b. भारतीय अर्थव्यवस्थेतील महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत का? याचा सखोल अभ्यास करणे.
c. महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी शासनाने कोणकोणत्या धोरणांची अंमलबजावणी केली आहे त्याचा सर्वांगीण अभ्यास करणे.

**महिलांचे आर्थिक सक्षमीकरण :**

"न स्त्री स्वातंत्र्य अर्हती' मनुस्मृतीतील या संस्कृत सुभाषिताचा अर्थ प्राचीन काळातील महिलांनी बालपणी पित्याच्या, तारूण्यात पतीच्या आणि वार्धक्यात पुत्राच्या नियंत्रणात राहिले पाहिजे असा अर्थ काढला होता.

स्त्रियांचे वर्णन करताना कवि बी म्हणतात, सोन्याची तनू जाळीतेस आपूली पाषाण मुर्तीपुढे मुग्धे ते वद कोण पुण्य तुझीया, हातात तेणे चढे.



Scanned with OKEN Scanner

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

रूढी परंपरांच्या पाषाण मुर्तीपुढे आपले सोन्यासारखे शरीर नष्ट करणाऱ्या आणि स्वतःच्या दुःखाची जाणीव असूनही मुग्धमानाने ते पचविणाऱ्या स्त्रियांना कोणते पुण्य मिळते? असे वर्णन केले आहे. पुरूषप्रधान संस्कृतीमध्ये दुर्लक्षित असलेल्या स्त्री शक्तीला घटनेने दिलेल्या मुलभूत हक्कांमुळे आज प्रत्येक क्षेत्रात तिला संधी मिळत आहे. मिळालेल्या संधीचे त्या सोनं करत आहेत. परंतु गरज आहे पुरूषांनी आपला दृष्टीकोन बदलून त्यांना प्रोत्साहन देण्याची.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महिलांच्या विकासाची एकूण वाटचाल पाहता स्त्रिया कल्याणाकडून तिच्या विकासाकडे आणि विकासाकडून महिला सक्षमीकरणाकडे जात असल्याचे दिसून येते. याच काळात औद्योगिक क्रांती, नागरीकरण व मोठ्या प्रमाणात वैज्ञानिकरण घडून आल्याने चार भिंतीच्या आत अडकलेल्या महिला वर्गाला मोकळा श्वास घ्यायला संधी उपलब्ध झाली. अर्थातच ही संधी उपलब्ध करून देण्यासाठी अनेक समाजसुधारकांना आपले आयुष्य खर्च करावे लागले. त्याचेच फलीत म्हणून आज महिला स्वयंविकासाच्या मार्गावर मार्गक्रमण करीत असताना दिसत आहेत. भारतीय संविधानात अंतर्भूत करण्यात आलेले मुलभूत अधिकार, कर्तव्ये व मार्गदर्शक तत्वानुसार शासन महिलांच्या कल्याणाकरिता अनेकविध योजना, धोरणे व कार्यक्रम राबवीत आहे. याचा परिणाम महिलांच्या आर्थिक, सामाजिक तथा शैक्षणिक जीवनावर होत आहे. मानवी विकासाचे एक सर्वोत्तम साधन म्हणून आपण शिक्षणाला संबोधतो. त्यामुळे महिलांना शिक्षणामध्ये समान संधी उपलब्ध असायला हवी किंवा पुरूषांपेक्षा अधिक सुविधा महिलांकरीता उपलब्ध असाव्यात. शिक्षणामुळेच महिलांमध्ये अनेक कौशल्ये विकसित होण्यास मोठा वाव मिळत आहे. विशेषतः ग्रामीण क्षेत्रातील महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण व त्यानुसार रोजगार प्राप्तीचे प्रमाण नागरी भागातील महिलांपेक्षा कमीच आढळते. ज्यांना शिक्षणासोबत विविध कौशल्यांचे शिक्षण व प्रशिक्षण मिळाले. त्यामधूनही महिला सक्षमीकरणास भरपूर वाव मिळतो.

शिक्षणातील महिलांचे प्रमाण वाढवून त्या रोजगारक्षम कशा बनू शकतील आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी शासन विविध योजना राबवीत आहे. यामध्ये महात्मा गांधी शहरी, ग्रामीण रोजगार हमी योजना, राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका कार्यक्रम, राष्ट्रीय महिला कोष, महिला योजना ज्यामध्ये महिला उद्योजकतेला प्राधान्य देण्यात आले आहे. डिजीटल इंडियातही महिलांना उद्योजकतेत प्राधान्य व आर्थिक विकासात त्यांचा समावेश करण्यात आला. प्रधानमंत्री जन-धन योजनेत लाखो महिलांचे बँक खाते सुरू करण्यात आले आहे. ज्यामधून महिलांमध्ये कौशल्य विकसित करणे व रोजगारक्षम बनविणे हा मुळ उद्देश आहे.

विशेषतः ग्रामीण भागातील महिलांना रोजगारभिमुख शिक्षण व प्रशिक्षण देऊन त्या स्वतः आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील याकरीता विविध उपक्रमाद्वारे महिलांना लघु व व्यवसायीक प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न केला जात आहे. ज्यामधून आज बहुतांश महिला स्वतःचा संसार सांभाळून आपला घरगुती उद्योग, व्यवसाय करून आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होत आहेत. जसे शिवणकाम, विणकाम, ब्युटीपार्लर, अन्न उद्योग, पोळी भाजी केंद्र, विविध कलाकुसरीचे छोटे-छोटे उद्योग इत्यादी व्यवसाय त्या चालवत आहेत. याच बरोबर बचत गटाच्या माध्यमातून महिला संघटन करून त्याद्वारेही अनेक लघु व्यवसायांचे प्रशिक्षण घेऊन त्या स्वतःचा व्यवसाय करू लागल्या आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळातील महिलांच्या विकासाची एकूण वाटचाल पाहता, सर्व विकास कार्यात महिलांना सहभागी करून घेण्याच्या उद्देशाने 1975 हे वर्ष संयुक्त राष्ट्र संघटनेने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषीत केले. विशेष म्हणजे 1994 मध्ये महिला धोरण करणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य ठरले.

राष्ट्राच्या विकासात स्त्रियांचे महत्वपूर्ण स्थान लक्षात घेऊन भारत सरकारने 2001 हे वर्ष महिला सक्षमीकरण म्हणून घोषीत केले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या धर्तीवर अन्य सर्व संस्थांमध्ये निर्णय प्रक्रियेत महत्वाचा सहभाग असण्याची महिला आरक्षण ग्रामसभेच्या धर्तीवर महिला सभा, स्वयंसहाय्यता गट निर्माण करून 5 वर्षात 5 लाख महिलांना सक्षम करण्याचे उद्दिष्ट. प्रत्येक शासकीय योजनेत महिलांना लाभाची निश्चित हमी सर्व शासकीय, निमशासकीय विभाग, सहकारी संस्था, शिक्षण संस्था इत्यादींना महिला सक्षम करण्यासाठीच्या कृती कार्यक्रमाची सनद तयार करणे बंधनकारक राहील. अशा संस्था दरवर्षी 3 जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले स्त्री मुक्तिदिन साजरा करून त्यांचे वाचन करतील. एवढेच नाही तर 14 एप्रील 2011 रोजी राज्य विधिमंडळाने विधेयक संमत करून त्यात महाराष्ट्र स्थानिक पंचायत राज व्यवस्थेत महिलांचा सहभाग असावा तसेच स्थानिक महिलांना अधिक सक्षम बनविण्यासाठी पंचायत राज व्यवस्थेत 50 टक्के आरक्षण दिलेले आहे.

**शासनाच्या विविध योजना :**

**1) निराधारांसाठी शासनाचा आधार :**

निरक्षित महिलांसाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत आधारगृहाची निर्मिती झाली.

**2) बालिका समृद्धी योजना :**

केंद्र शासनाच्या या योजने अंतर्गत कुटूंबातील जास्तीत-जास्त दोन मुलींसाठी अर्थसहाय्य दिले जाते.

**3) इंदिरा गांधी महिला संरक्षण योजना :**

पिडीत महिलांसाठी इंदिरा गांधी महिला संरक्षण योजना सुरू करण्यात आलेली आहे.

**4) देवदासी पुनर्वसन योजना :**

या योजनेअंतर्गत ज्या देवदासी असतात. त्यांना किंवा त्यांच्या मुलींना विवाहासाठी 10 हजार रूपये इतके अनुदान दिले जाते.

**5) महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षणाची योजना :**



Scanned with OKEN Scanner

15 वर्षाच्या वरील महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण उपलब्ध करून देणे हा या योजनेचा उद्देश आहे.

**6) सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना :**

शहरी भागातील माहितीसाठी सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना राबविली जाते. ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या महिलांना स्वयंरोजगाराद्वारे आर्थिक मदत भागविण्यासाठी बचत गटाच्या माध्यमातून अर्थसहाय्य करणारी महिला स्वावलंबन योजना राबविणे.

**7) महिला बचत गट :**

आज महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी स्वबळावर उभे राहिले पाहिजे. यासाठी शासन मदत करत आहे. जिद्द, मेहनत, धाडस या बळावर उद्योग व्यवसायातून महिलांना यशस्वीपणे समृद्धी खेचून आणता येत आहे.

**8) 2013 चे महिला सक्षमीकरण शासनाचे धोरण :**

महिलांना सन्मान, प्रतिष्ठा, शिक्षणव्यवस्था, आरक्षण-संरक्षण देणाऱ्या राज्याच्या तिसऱ्या धोरणाचा मसुदा 8 मार्च 2013 रोजी महिला दिनाच्या दिवशी जाहीर झाला.

**9) महिलांना संपत्तीत समान हक्क :**

यापुढे प्रत्येक महिलेला स्वतःच्या कुटूंबात संपत्तीचा समान हक्क मिळणार आहे. सरकारच्या प्रत्येक अर्जावर यापुढे आई आणि वडील यांचे नाव बंधनकारक करण्यात आले आहे.

**10) जेंडर बजेट :**

राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक पातळ्यांवर स्त्री-पुरूष समानता प्रस्थापित होण्याकरीता, महिलांची सामाजिक स्तरावर प्रत वाढविण्याकरीता शासनाच्या प्रत्येक विभागासाठी कार्यक्रम निश्चित करणे आणि धोरण आखणे याचा पाठपुरावा करण्यासाठी जबाबदारी राज्य महिला आयोग व तत्सम यंत्रणेकडे द्यावी असे धोरणात म्हटले आहे.

**शेती व्यवसायांमध्ये महिलांचा सहभाग :**

भारत हा शेतीप्रधान देश आहे. भारतातील एकूण लोकसंख्येच्या जवळपास 70 टक्के लोकसंख्या शेती व शेतीपुरक उद्योग व्यवसायात गुंतलेले आहेत. शेती व शेतीपूरक उद्योग व्यवसायात 50 ते 60 टक्के महिला काम करतात. शेती व्यवसायामध्ये लागवड, निंदणी, पाणी देणे, राखण करणे, मळणी, उफनणी, निवडणे, विक्री, साठवणूक इ. अनेक कामांमध्ये महिलांचा मोठा सहभाग आहे.

महिलांच्या सहभागाशिवाय शेती व्यवसाय करणे अशक्य आहे. शेतीपूरक व्यवसायामध्ये सुद्धा महिलांचा महत्वाचा सहभाग आहे. दुध काढणे, जनावरांना चारा घालणे, दुध विक्री, . कामे महिला करत असतात. विशेषतः ग्रामीण महिलांचे आर्थिक सक्षमीकरण म्हणावे तसे झालेले नाही. आर्थिक सक्षमीकरणावरच महिलांचे सामाजिक व राजकीय सक्षमीकरण अवलंबून असते. नेमका हाच सक्षमीकरणाचा धागा पकडून देशाने व राज्याने विविध बचत गटाची स्थापना करून महिलांना विविध योजनांचा फायदा करून दिला आहे.

महिला बचत गटाच्या माध्यमातून आज महिलांनी अत्यंत उच्च टप्पा गाठला आहे. या बचत गटाच्या माध्यमातून शहरी व ग्रामीण भागातील महिला स्वावलंबी झालेल्या आहेत. समाज व राष्ट्राच्या सर्वांगीण विकास प्रक्रियेत त्यांचा सिंहाचा वाटा आहे. गावोगावी व शहरोशहरी बचत गट म्हणजे महिलांना सशक्त व सक्षमीकरणासाठी मिळालेले एक वरदान होय.

या बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक बचतीचे महत्त्व व गरज लक्षात घेऊन स्वयंसहाय्यता बचत गट हे एक माध्यम आहे. यामुळे महिलांची एकी व संघटन वाढते, बचतीची सवय लागते, महिलांना नवीन शिकण्याची संधी मिळते, निर्णयक्षमता प्राप्त होते. तसेच बचत गट सर्वांगीण विकासाचे उत्तम माध्यम आहे.

**महिला उद्योजकांसाठी विशेष योजना :**

भारत सरकार व विविध वित्तीय संस्थांनी महिला उद्योजकांसाठी वित्तसहाय्य करण्याच्या दृष्टीने व इतर विकासासाठी काही विशेष योजना जाहीर केलेल्या आहेत.

1) महिला उद्यमनिधी योजना
2) बीज भांडवल योजना
3) नॅशनल इक्विटी फंड योजना
4) पंतप्रधान रोजगार योजना किंवा सुशिक्षीत बेकारांसाठी योजना
5) एक खिडकी योजना
6) जिल्हा उद्योग केंद्र योजना
7) व्याज अनुदान योजना
8) स्त्री शक्ती योजना



Scanned with OKEN Scanner

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

9) खादी ग्रामोद्योगाच्या योजना
10) महिला आर्थिक विकास महामंडळाच्या योजना

**सारांश :**

भारतीय अर्थव्यवस्था आणि महिला सक्षमीकरण या विषयावर लेख लिहीत असताना असे दिसून आले की, महिला उद्योजकांचे प्रमाण सर्वात कमी असणाऱ्या देशांमध्ये भारताची गणना झाली आहे. जगभरात महिलांनी उद्योजकतेत आपला ठसा उमटवला आहे. परंतु भारतात महिलांना उद्योजक बनवण्यासाठी कमी संधी आहेत. कारण शिक्षणाचा अभाव, तंत्रज्ञानविषयक अज्ञान, संस्कार व चालीरीतींचा नको इतका पगडा यामुळे भारतात महिलांमध्ये उद्योजकता रूजवण्यात अडचण येत आहे.

महिला सक्षमीकरणाचे धोरण काळानुसार ग्लोबलायझेशनच्या गरजेनुसार, महिलांच्या उंचवलेल्या शिक्षण, प्रशिक्षण व महत्वाकांक्षेनुसार संधी देण्यावर भर देणारे हवे, बदलत्या देशाच्या अर्थव्यवस्थेनुसार आणि जागतिक आर्थिक परिस्थितीनिहाय स्वयंरोजगार, उद्योजकता, सेवा, व्यावसायिकता, इन्फ्रास्ट्रक्चर, उभारणी, वाहन, मार्केटिंग, बांधकाम क्षेत्रात सुद्धा महिलांच्या बुद्धीमत्ता, क्षमता, कोशल्य, कर्तृत्व आणि सुप्त शक्तींना वाव मिळायला हवा. महिला सशक्तीकरणात फक्त पारंपारिक व केवळ स्त्रियांसाठीचेच उद्योग असा विचार करण्याबरोबरच किंबहूना त्याही पुढे जाऊन मध्यम उद्योग व मोठ्या व्यवसायांमध्ये महिला उद्योजक व व्यवसायिकांना संधी, वाव, शिरकाव मिळायला हवा. अखंड परिश्रम करण्याची तयारी असलेल्या महत्वकांक्षेला शासन धोरणाची अनुकूलता लाभावी. म्हणजेच भारताच्या अर्थव्यवस्थेची वाटचाल विकसनशील अर्थव्यवस्थेकडून विकसीत अर्थव्यवस्थेकडे होऊन भारत जागतीक पातळीवर आर्थिक महासत्ता होण्यास वेळ लागणार नाही.

**निष्कर्ष :**

1) भारतीय अर्थव्यवस्थेत महिला सामाजिक, आर्थिक क्षेत्रात सक्षम होत असताना दिसून येत आहेत.

2) भारतीव महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहेत. परंतु 100 टक्के महिला या आर्थिकदृष्ट्या सक्षम नाहीत, तसेच येणाऱ्या काळात ही परिस्थिती पहायला मिळेल असे दिसून येते.

3) महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध धोरणे शासनाने जाहीर करून त्याची अंमलबजावणी केल्यामुळे बहुतांश महिलांनी संधीचे सोने करून महिला उद्योजक बनत आहेत.

4) महिला सक्षमीकरणासाठी शासनाने बचत गट चळवळीच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरणाचा पाया घातला आहे. या माध्यमातून अनेक उद्योजिका व त्यांचे समूह आज विकासाकडे वाटचाल करीत आहेत.

5) आज ग्रामीण व शहरी भागात बचत गट अस्तित्वात आहेत. परंतु केवळ पैसे साठवणे व बचत करणे हे कार्य न राहता हेच बचत गट आज अनेक महिला उद्योजक घडवत आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात उद्योग निर्माण होऊन आर्थिक साक्षरता वाढत आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

1) प्रा. राम देशमुख : अर्थमोळी (मराठवाडा अर्थशास्त्र परिषद, अध्यक्षीय भाषणे), विमल प्रकाशन, नांदेड.
2) गंगाधर महाम्बरे : महिलांसाठी उद्योग व्यवसाय, मेहता पब्लीशिंग हाऊस, पुणे.
3) धोंडीरामसिंह राजपूत : सक्षम महिला, शुभ प्रकाशन, औरंगाबाद.
4) डॉ. वैरागडे, प्रा. लाटकर, प्रा. मुळे : आधुनिक गृहव्यवस्थापन, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.
5) पी. पी. देशमुख : उद्योजक, मार्च 2017.
6) पी. पी. देशमुख : उद्योजक, एप्रिल 2017.
7) पी. पी. देशमुख : उद्योजक, सप्टेंबर 2017.

❑❑❑



Scanned with OKEN Scanner